## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 12th June 2007

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2007/C.R. 196(1)/M-1.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), and in supersession of all the previous orders, notifications or instruments issued in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby remits the stamp duty in the whole chargeable on the instruments of Hypothecation, Pawn, Pledge, Deposit of Title Deeds (under Article 6), Conveyance (under Article 25), Further charge on mortgaged property (under Article 33), Lease (under Article 36), and Mortgage Deed (under Article 40), in the Schedule I to the said Act, executed by any person for starting a new industrial unit or extension, expansion or diversification of any existing the industrial unit in group C, D, and D+ areas and in no industry district, classified as such area under the Package Scheme of Incentives, 2007 introduced under Government resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-1707/(CR-50)/IND-8, dated the 30th March 2007, for the period commencing from 1st April 2007 and ending on the 31st March 2011 subject to following condition :—

*Condition*.—Any unit failing to start the activities for which remission is granted or commits breach of any of the conditions of the Package Scheme of Incentives, 2007, shall be liable to pay the stamp duty and penalty as if, there was no remission from the beginning.

*Explanation*.—For the purpose of this order, " New industrial unit " or " extension, expansion or diversification of any existing Industrial unit " means an industrial unit, which is so certified to be such unit,

by the Implementing Agency specified under clause 2 of the Package Scheme of Incentives, 2007 or any other officer authorised by it in this behalf.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,

Joint Secretary to Government.

असा. क्र. १२०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, जून १३, २००७/ज्येष्ठ २३, शके १९२९

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून २००७

**आदेश**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक-२००७/प्र.क्र.-१९६(१)/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत काढलेले सर्व आधीचे आदेश, अधिसूचना किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली असल्याने, ते याद्वारे, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक पीएसआय. १७०७/(सीआर-५०)/आयएनडी-८, दिनांक ३० मार्च २००७ याअन्वये सुरू करण्यात आलेल्या सामूहिक प्रोत्साहन

योजना, २००७ अंतर्गत गट "क", ड आणि ड + असे वर्गीकरण केलेल्या क्षेत्रात आणि "ना उद्योग जिल्हा" म्हणून वर्गीकृत करण्यात आलेल्या जिल्ह्यात एक नवीन औद्योगिक युनिट सुरू करण्यासाठी किंवा कोणत्याही विद्यमान औद्योगिक युनीटाचा विस्तार करण्यासाठी, तो वाढविण्यासाठी किंवा त्याचे विकेंद्रीकरण करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेल्या, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीतील (अनुच्छेद ६ खालील) तारणगहाण, तारण, हडप, हक्कनिक्षेप ठेव संलेख, (अनुच्छेद २५ खालील) अभिहस्तांतरणपत्र, (अनुच्छेद ३३ खालील) गहाण मालमत्तेवर अधिक भार लादणारा संलेख, (अनुच्छेद ३६ खालील) भाडेपट्टा आणि (अनुच्छेद ४० खालील) गहाण विलेख यांवर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क, १ एप्रिल २००७ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी पुढील शर्तीवर पूर्णतः माफ करीत आहेत :—

**शर्त.**—ज्या कामांसाठी माफी देण्यात आली आहे ती कामे सूरू करण्यात कसूर करणारे किंवा सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या कोणत्याही शर्तीचा भंग करणारे कोणतेही युनिट, जणू काही सुरूवातीपासूनच माफी देण्यात आली नसल्याप्रमाणे, मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनासाठी "नवीन औद्योगिक युनिट" कोणत्याही विद्यमान औद्योगिक युनिटाचा "विस्तार, वृद्धी किंवा विक्रेंद्रीकरण करणे" याचा अर्थ, सामूहिक प्रोत्साहन योजना, २००७ याच्या खंड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने असे युनिट म्हणून प्रमाणित केले असेल असे औद्योगिक युनिट, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सहसचिव.